जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,ठाणे
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०२.०९.२०२६**

''ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १ च्या हद्दीतील प्रॉपर्टी मिसींग मधील ५ लाख ४० हजार रूपये किंमतीचे ३५ मोबाईल फोन तांत्रीक माहितीच्या आधारे हस्तगत ''

ठाणे पोलीस आयुक्तातयातील परिमंडळ-१ मधील कळवा, मुंब्रा, डायघर, राबोडी, ठाणेनगर, नौपाडा या पोलीस ठाणे हद्दीत सन २०२५ ते सन २०२६ मध्ये मोबाईल फोन गहाळ झाल्याच्या तक्रारी मोठया प्रमाणात प्राप्त झाल्या होत्या. यातील गहाळ मोबाईल फोन चा ब्म्प्त्या तांत्रीक प्रणालीचा वापर करून सदर मोबाईल फोनचा शोध घेणेबाबत मा. वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या.

नमुद दाखल प्रॉपर्टी मिसींग तक्रारीचा समांतर तपास गुन्हे शाखा घटक १, ठाणे कडुन करण्यात येत असताना गुन्हे शाखा घटक ०१ चे नेमणुकीतील पोशि/८०६६ प्रशांत लवटे व पथक यांनी मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे पोलीस आयुक्तातयातील परिमंडळ १ मधील सन २०२५ ते सन २०२६ मधील गहाळ मोबाईल फोनबाबतची सविस्तर माहीती गोळा करून चिकाटीने व मेहनतीने CEIR या तांत्रीक प्रणालीचा वापर करून यातील गहाळ झालेले ५ लाख ४० हजार रूपये किंमतीचे ३५ मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी श्री.पंजाबराव उगले, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. शेखर बागडे,सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध-१, गुन्हे शाखा, ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक १ चे वपोनि/श्री अनिल शिंदे, पो.नि./वालझाडे, म.सपोनि/ चित्रा चौधरी, पोउपनि/शिरसाठ, सुभाष मोरे, श्रे.पो.उप. नि./जाधव, सहा.पो.उप.निरी. दयानंद नाईक, सुनील माने, उज्वला कुबल, पोहवा/ नागराज सोनकडे, अविनाश पाटील, संदिप महाडिक, व्यंकट धायगोडे, शेखर तडवी, शब्बीर फरास, नंदकुमार पाटील, धनंजय आहेर, दिपक जाधव, मुकंद आव्हाड, गणेश बडगुजर, शशिकांत सावंत, मलीका बहीरम, दिपाली जाधव, पो.ना/ निशीकांत पाटील, पोशि/ प्रशांत लवटे, अमोल ढावरे, मयुर लोखंडे, सागर सुरळकर, यांनी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,ठाणे